महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र. मासंवि/रवका/न.क्र.९/
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला धारावी रोड, माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
Website : www.mahdiscom.in

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ६०३ दि. १६.०३.२०२०

**विषय : म.रा.वि.वि.कं.मर्या मधील कार्यरत अधिकारी/ कर्मचारी किंवा नातेवाईकांच्या नावे असलेल्या कर्मचारी किंवा नातेवाईकांच्या नावे असलेल्या संस्था व त्यांच्या कंपनीशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असलेले व्यवसायिक संबंधाबाबतच्या माहितीचा तपशील दर्शविणारे घोषणा पत्र सादर करणेबाबत.**

-------

म.रा.वि.वि.कं.मर्या कंपनीचे कर्मचारी सेवाविनियम २००५ सेवाविनियम क्र. ८५ (झ), (२), (ध) (१) व (२) अन्वये कंपनी मधील वेतनगट १ ते ४ मध्ये कार्यरत सर्व अधिकारी व कर्मचारी यांना ते स्वत: किंवा त्यांचे नातेवाईकांच्या नावे असलेल्या संस्था व त्यांचे कंपनीशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असलेले व्यवसायीक संबंधाबाबतची माहिती कंपनीस सादर करणे अनिवार्य आहे.

२. परंतू असे निदर्शनास आलेले आहे की, बरेचसे अधिकारी/ कर्मचारी सदर माहिती कंपनीस अद्यापही सादर करीत नाही. ग्राहकांकडून/ अन्य माध्यमातून याबाबतच्या तक्रारी प्राप्त झाल्या असून याबाबत तपासणी केल्यानंतर अशा प्रकरणी कंपनीचे कर्मचारी दोषी असल्याचे आढळून आले आहे, परिणामी त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई देखील करण्यात आलेली आहे. यास्तव अधिकारी/ कर्मचारी यांनी वैयक्तीक हितसंबंधाकरीता अधिकाराचा गैरवापर करू नये या दृष्टीकोनातून प्रतिबंधात्मक उपाय म्हणून अधिकारी/ कर्मचारी यांनी अशाप्रकारच्या व्यवसायीक संबंधांबाबतचे घोषणापत्र सादर करण्याची बाब विचारधिन होती. सबब, सदर घोषणापत्राचा नमुना निश्चीत करण्यात आला असून, सर्व कर्मचाऱ्यांनी मालमत्ता विवरण पत्रे सादर करते वेळी विहीत नमुन्यातील घोषणापत्र Employee Portal द्वारे सादर करणे आवश्यक आहे.

३. सदर पत्रा मध्ये कंपनीतील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे व त्यांच्या नातेवाईक म्हणजे पती / पत्नी, मुले, आई/ वडील, बहिण भाऊ, जावई/ सून व विवाहामुळे झालेले नातेवाईक (In-laws) म.रा.वि.वि.कं.मर्या च्या व्यवसायामध्ये म्हणजेच कंत्राटी कामे (Contractual work) / निविदा कामे (Tender Work) ईत्यादी या संबंधीत सर्व माहिती कंपनीस सादर करणे अनिवार्य राहिल.

४. सदर घोषणापत्र हे कंपनीच्या Employee Portal वर 'Declaration' ह्या शीर्षकाअंतर्गत "अधिकारी कर्मचारी किंवा नातेवाईकांच्या नावे असलेल्या संस्था व त्यांच्या कंपनीशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असलेले व्यवसायीक संबंधाबाबतची माहितीचा तपशील दर्शविणारे विवरण पत्र" असे (परिशिष्ट 'अ') समाविष्ट राहिल सदर घोषणा पत्र प्रत्येक वर्षी ३१ मार्चच्या स्थितीस अनुसरून त्या वर्षीच्या ३१ मे पर्यंत सादर करावे.

५. सर्व अधिकारी / कर्मचारी यांना उपरोक्त सूचनांचे अवलोकन करून त्या अनुषंगाने काटेकोरपणे अंमल बजावणी करण्याच्या सूचना देण्यात येत आहेत, उपरोक्त सूचनांचे पालन न केल्याचे निर्दशनास आल्यास पालन न करण्याऱ्या अधिकारी / कर्मचारी यांचे विरूध्द शिस्तभंग कार्यवाही करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

६. सदर प्रशासकीय परिपत्रक हे जारी केलेल्याच्या दिनांकापासून लागू राहिल.

७. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या **E-Library** वर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

**सोबत : परिशिष्ट 'अ'**

**(कमांडर शिवाजी इंदलकर) (से.नि.)**
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

परिशिष्ट 'अ'

# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

## घोषणा पत्र

### कर्मचारी किंवा नातेवाईकांच्या नावे असलेल्या संस्था व त्यांच्या कंपनीशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असलेले व्यवसायिक संबंधाबाबतच्या माहिती

(वाचा म.रा.वि.वि.कं.मर्या सेवाविनियम क्र. ८५ (झ), (२), (ध) (१) व (२))

| अ.क्र. | नातेवाईकाचे नाव व नाते | नातेवाईकांच्या मालकीचे संस्था / एजन्सीचे नाव (स्तंब क्र.०२ मधील ) | व्यवहाराचे तपशील (चालु निविदाच्या कामाचे तपशील) | प्रत्येक ऑर्डर / निवीदा यांच्या व्यवहाराचा प्रकार व एकुण रक्कम (ऑर्डर / निवीदा स्तंब क्र.०४ मधील ) | ऑर्डर/ निवीदा ह्या अधिकारी / कर्मचारी यांच्या कामाच्या कार्यक्षेत्रामध्ये आहे किंवा कसे ? | कंपनीच्या कर्मचारी सेवाविनियम क्र. ८५ (झ), (२), (ध) (१) व (२) अन्वये मंजुरी प्राप्त झालेली आहे का ? (मंजुरी करीता केलेले अर्ज किंवा कंपनीकडून मंजुरी प्राप्त झालेले पत्र सोबत जोडावे. ) | दिनांक ३१ मार्च ..... च्या स्थितीस अनुसरुन |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| | | | | | | | |

**स्वघोषीत प्रमाणपत्र:** वर नमदकेलेली माहिती माझ्या माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे संपूर्ण सत्य व बिनचूक आहे.

**सही :**

**कर्मचाऱ्याचे नाव :**

**पदनाम :**

**संवर्ग :**

**सध्याचे कामाचे ठिकाण :**

**टिप :**

नातेवाईक म्हणजे पती / पत्नी, मुले, आई/ वडील, बहिण भाऊ, जावई/ सून व विवाहामुळे झालेले नातेवाईक (In-laws) जे म.रा.वि.वि.कं.मर्या च्या व्यवसायामध्ये म्हणजेच प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष असलेले व्यवसायिक संबंधाबाबतच्या जसे कंत्राटी कामे (Contractual work) / निविदा कामे (Tender Work) ईत्यादी